- ८/८ -

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम ८८ अन्वये आदेश

जा.क्र.सनिसे/नियमन/क.८८/जं.का.स.सं.म.के./ ९६२/२०१७,
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,सेलू यांचे कार्यालय,
दिनांक- १६-०३-२०१७

वाचावे- १] महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये तरतुद
२] आदिवासी जंगल कामगार सहकारी संस्था मर्या. केळझर नोंदणी क्र.४१२१ या संस्थेचा सन २०१५-२०१६ चा विशेष लेखापरिक्षण अहवाल

ज्याअर्थी, आदिवासी जंगल कामगार सहकारी संस्था मर्या. केळझर नोंदणी क्र.४१२१ हि संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या तरतुदीनुसार नोंदणी झाली असून, तिला सदर कायदा व नियम तसेच संस्थेचे मंजूर उपविधी यातील तरतुदी लागू आहेत.

ज्याअर्थी, आदिवासी जंगल कामगार सहकारी संस्था मर्या. केळझर नोंदणी क्र.४१२१ या संस्थेचा वाचावे क्र. २ अन्वये सन २०१५-२०१६ चा विशेष लेखापरिक्षण अहवाल या कार्यालयास प्राप्त झाला असुन, सदर अहवालानुसार संस्थेच्या व्यवहारात अपहार व गैरव्यवहार झाल्याचे आढळून आल्याने संस्थेचे लेखापरिक्षक यांनी विशेष अहवाल सादर केलेला आहे व सदर विशेष अहवालानुसार कार्यवाही करणे क्रमप्राप्त आहे.

ज्याअर्थी, वाचावे क्र. २ नुसारच्या विशेष अहवालात संस्थेच्या सन २०१५-१६ च्या कालखंडात संस्थेच्या रकमांचा अपहार व संस्थेमध्ये गैरव्यवहार झाल्याचे लेखापरिक्षकांनी स्पष्ट केले आहे. व सदर अपहार व गैरव्यवहार होवू नये व संस्थेस नुकसान पोहचू नये याकरीता संस्थेचे संबंधित कर्मचारी सचिव तसेच संस्थेची व्यवस्थापन समिती यांची जवाबदारी असतांना संबंधितांनी आपल्या जवाबदारीचे पालन केले नाही. व संस्थेच्या झालेल्या नुकसानीस नेमके कोण जबाबदार आहे. हे निश्चित करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी, उपरोल्लेखित विशेष अहवालानुसार संस्थेला खालीलप्रकारे झालेल्या अपहार व गैरव्यवहारानुसार मोठया प्रमाणावर नुकसान झाले आहे.

१] महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १३३ चे उल्लघंन करुन संचालक मंडळाने मासिक सभेत संस्थेच्या मालकीचे शेत सर्वे नं. १३९ (अ) १३९ (ब) १७८ व ५०८ मधील साग कटाई करुन संपुर्ण झाडे ७ लाखापर्यंत विकण्याचा ठराव पारीत झालेला असताना विक्री केवळ ५ लाखातच कलेली आहे. तसेच सदर विक्रीतुन प्राप्त रक्कम धनादेशाव्दारे न घेता रोखीने घेऊन नियम बाहय कृत्य केलेले आहे. वनखात्याच्या नियंत्रणाखाली लिलाव प्रक्रिया व १०० टक्के रक्कम जमा करण्याची कार्यवाही करणे प्रलंबीत आहे. सदर कृत्याला सर्वस्वी संचालक मंडळ जबाबदार आहे.

२] संस्थेने पोटनियम क्र. ग-१-२२ मध्ये (टी) नुसार संस्थेच्या सदस्य जे प्रत्यक्ष कुपात काम करतात त्यांना कामाकरीता आगावु रक्कम देण्याची तरतुद असतांना संस्थेने वरील प्रमाणे प्राप्त रक्कमेतुन संचालकांचा अग्रीम बाबतचा अर्ज नसतांना मासिक सभेची मंजुरी न घेता वैयक्तिक अग्रीम दिलेला आहे. उपरोक्त कृतीला संपुर्ण संचालक मंडळ जबाबदार असुन संस्थेच्या संचालक मंडळाकडुन एकुण वसुल प्राप्त रु.१,२०,०००/- आहे.

३] संस्थेच्या संचालकांना बैठक भत्ता मर्यादेपेक्षा जास्त अदा करण्यात आला आहे. संबधीत संचालक संचालक मंडळाकडुन रु. १२,४६८ /- व श्री. एम.एम.कौरती यांचे कडुन रु.२६००/- असे एकुण १५,०६८/- वसुलीस पात्र आहे.

४] संस्थेचे कर्मचारी श्री. दिवाकर वि. धुर्वे यांना दिलेला पगार ॲडव्हान्स याची नोंद कॅशबुकला असली तरी प्रत्यक्षात संस्था दप्तरी याबाबत नोंद/व्हावचर उपलबध नाही. सदर व्यवहार संशयास्पद आहे. याबाबत रक्कम रु. ८१,०००/-प्रभारी सचिव श्री. एम.एम.कौरती यांचेकडुन वसुलीला पात्र आहे.

५] श्री. अविनाश विठलराव भोरे डेपो लिपीक यांनी कपिल टिंबर यांचेकडुन वसुल केलेली रक्कम रु. २३,६३०/- ची नोंद जमा पावती बुकात असली तरी त्याची नोंद कॅशबुकात नाही. श्री. कौरती यांचे खुलाशानुसार सदर रक्कम संस्थेत जमा नसल्याचे सादर केले आहे. त्यामुळे सादर रक्कमेची संयुक्त जबाबदारी श्री. भोरे व श्री. कौरती यांची आहे.

त्यामुळे उपरोक्त नमुद संस्थेच्या नुकसानीस संस्थेचे संचालक मंडळ, पदाधिकारी, सचिव व कर्मचारी हे जबाबदार असून झालेल्या नुकसानीची जवाबदारी त्यांचेवरही निश्चित करणे आवश्यक आहे असे माझे स्पष्ट मत झाले आहे. करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहेत.

**//आदेश//**

मी, चैतन्य एच. नासरे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सेलू ता. सेलू जि. वर्धा मला प्राप्त महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ व महाराष्ट्र शासनाचे आदेश क्र. १४९३/ ११६२/ सी. आर.४७/ १५-सी दिनांक ७ ऑगस्ट १९९३ अन्वये मला प्राप्त अधिकारान्वये वर नमुद सर्व बाबींची चौकशी करुन आदिवासी जंगल कामगार सहकारी संस्था मर्या. केळझर नोंदणी क्र.४१२१ या संस्थेला झालेल्या नुकसानीची जवाबदारी सर्व संबंधितांवर निश्चित करण्यासाठी श्री चैतन्य एच. नासरे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सेलू ता. सेलू जि. वर्धा यांची नियुक्ती करीत आहे.

प्राधिकृत अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्थां अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ तसेच संस्थेचे उपविधी यातील तरतुदीनुसार चौकशी करुन सहा महिन्याचे आत चौकशी अहवाल सादर करावा.

सदर आदेश माझे सही शिक्क्यानिशी दि १६-०३-२०१७ रोजी पारित करण्यात आले.

१६।३।१७

[चैतन्य एच. नासरे]
सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,सेलू

स्थळ- सेलू
दिनांक- १६-०३-२०१७
प्रति-

१] श्री चैतन्य एच. नासरे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सेलू ता. सेलू जि. वर्धा यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त विहित चौकशी कायदा, नियम व संस्थेचे उपविधी यानुसार करुन तसा चौकशी अहवाल दोन वर्षाच्या कालावधीत पूर्ण करुन या कार्यालयास सादर करावा.

२] अध्यक्ष/सचिव संचालक, आदिवासी जंगल कामगार सहकारी संस्था मर्या. केळझर र.नं.४१२१ त्यांना सुचित करण्यात येते की, अंदाजित चौकशी खर्च रु. २५,०००/- मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यांचे पी.एल.ए खात्यात तात्काळ जमा करावी व प्राधिकृत चौकशी अधिकारी यांना चौकशीचे कामी सहकार्य करावे.

३] संचालक, आदिवासी जंगल कामगार सहकारी संस्था मर्या. केळझर र.नं.४१२१ त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी प्राधिकृत चौकशी अधिकारी यांना संस्थेचा संपूर्ण रेकॉर्ड उपलब्ध करुन दयावा. तसेच चौकशीच्या केसेस पाठविणे, कागदपत्रांचा पुरवठा करणे आदि संदर्भातील सहकार्य करावे.

४] सचिव, आदिवासी जंगल कामगार सहकारी संस्था मर्या. केळझर र.नं.४१२१ यांना सुचित करण्यात येते की, प्राधिकृत चौकशी अधिकारी यांना चौकशीकरीता आवश्यक असलेला रेकॉर्ड व माहिती देऊन सहकार्य करावे.

प्रत माहितीस्तव सविनय सादर-

१] मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर
२] मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वर्धा
३] मा. जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था, वर्धा.

१६।३।१७

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, सेलू